सौ. उषा प्रभुणे_न
३९८७ ॲव्हिग ॅान लेन,
सॅन होजे, कॅलिफोर्निया ३५३४५
अमेरिका
usha_prabhune@yahoo.com

# हवाईतील जोशिली साठ किलो मिटर्सची बाइक टूर !




प्रशांत महासागरात नितांत सुंदर हवाई बेटे आहेत. मौई हे त्यांपैकीच एक. या बेटावरची ‘हालेआकला बाइक टूर’ ही एक अत्यंत प्रसिद्ध टूर आहे. हा लोकप्रिय साहसी खेळ आहे. १९८६ मध्ये ही टूर सुरू झाली. वॉटर रॅफ्टिंगपेक्षाही ही टूर अत्यंत धोकेदायक मानली जाते.

मौवी बेटावरील प्रसिद्ध मृत हालेआकला (Haleakala) ज्वालामुखीच्या तीव्र उतारावरून साधारण साठ कि.मि.अंतर सायकलने वेगात उतरत येणे असे या साहसी खेळाचे स्वरूप आहे. या टूरमध्ये आजवर सतत अपघात होत आलेले दिसतात. तीव्र उतारामुळे सायकल चालवणाराचा सायकलवरचा ताबा सुटतो. अपघात होतात. दुखापती होतात. मृत्यूही होतात. म्हणून अमेरिकेच्या ‘नॅशनल पार्क सर्व्हिस’ने याचा गंभीरपणे अभ्यास केला. या बाबतीत अहवाल प्रसिद्ध केला. या नंतर मग २००७ पासून अगदी आजपर्यंत या साठ कि.मि.अंतराच्या बाइकटूरवर ‘ हालेआकला नॅशनल

पार्क 'ने बंदी घातलेली आहे. तीव्र उताराचा व धोकादायक मार्ग वगळून आता सध्या फक्त बेचाळीस कि.मि.सायकलटूरलाच परवानगी आहे.

या साहसी खेळातून सुखरूप राहिलो :

मी व माझे पती अरुण प्रभुणे २००१ च्या मे महिन्यात हवाई बेटांचे सौंदर्य अनुभवायला गेलो होतो. आमच्या लग्नाच्या पंचवीसाव्या वाढदिवसाचे निमित्त साधून आमची दोन्ही मुले उदय आणि सत्यव्रत यांनी आठ दिवसांची ही सहल ठरवली होती. त्या वेळी या टूरवर बंदी नव्हती. आम्ही साठ कि.मि.बाइकटूर आनंदाने केली ! साठ कि.मि.बाइकटूरवरील बंदीची वेबसाइटवरील माहिती वाचून आपण या साहसी खेळातून कसे सुखरूप राहिलो हे आठवून मन अचंबित होते. आनंदित होते.

हवाई बेटांवरचा आजचा आमचा दुसरा दिवस होता. या दुस-या दिवशी आम्ही दोन टूर्स घेतल्या होत्या. हवाई बेटाजवळील मौई बेटावर सकाळी आम्ही स्नॉर्कलिंग केले होते. दुपारच्या सत्रात पाणबुडीची टूर (submarine tour) घेतली होती.

या दोन्ही टूर्समुळे आज आम्ही खूप दमलो भागलो होतो. मुलांनी सांगितल्याप्रमाणे संध्याकाळीच आम्हाला हॉटेलवर जाऊन थोडी विश्रांती घ्यायची होती आणि लगेच जेऊन झोपून जायचे होते. तुम्ही विचाराल एवढी घाई कसली होती ? अहो, तीन चार तास झोपून आम्हाला मध्यरात्री १-३० लाच उठून सगळे उरकून २-१५ वाजता तयार होऊन बसायचे होते. मध्यरात्रीच सगळे आवरून हॉटेलच्या बाहेर खुणेच्या जागी STOP च्या पाटीजवळ थांबायचे होते. कशासाठी तर जगप्रसिद्ध मानला जात असलेला अप्रतीम असा सूर्योदय पाहण्यासाठी आणि साहसी बायसिकल रायडिंगसाठी !

'हालेआकला ( अमेरिकेतील उच्चार ) सन राइज टूर' (Haleakala Sun Rise Tour) व 'माउंटन रायडर्स टूर' (Mountain Riders Tour) आयोजित करणा-या कंपन्या आम्हाला दोन टूर्स घडवणार होत्या. आधी आम्हाला हालेआकला मृत ज्वालामुखी पर्वतावर व्हॅनने नेऊन रम्य व प्रसिद्ध असा सूर्योदय दाखवणार होत्या. नंतर साहसी खेळ (Adventures Game) म्हणून दहा हजार फुटांवरून साधारण चाळीस मैल म्हणजे साधारण साठ सकिलो मिटर्स सायकलिंग करीत हालेआकला पर्वत वेगाने उतरत येण्याचा आनंद मिळवून देणार होत्या.

या कंपन्यांनी यासाठी आम्हाला थंडीचे कपडे, हातमोजे वगैरे घालून यावयास सांगितले होते. त्यामुळे त्याप्रमाणे आम्ही तयार होऊन ठरल्याप्रमाणे हॉटेलच्या बाहेर जाऊन STOP वर जाऊन थांबलो. खरं म्हणजे एवढ्या रात्री तिथे सगळे शांतच शांत होते. आम्हाला भीती वाटू लागली. तेवढ्यात हॉटेलचा सुरक्षारक्षक (watchman) आमच्याशी येऊन गप्पा मारू लागला. तो फिजी होता. तो आल्याने आमची भीती गेली. गप्पा करता करता आम्ही पिक-अप व्हॅनची वाट पाहू लागलो.

हालेआकला मृत ज्वालामुखीवर :

आम्ही ज्या ज्वालामुखी पर्वतावर जाणार होतो त्याचे नाव होते 'हालेआकला मृत ज्वालामुखी.' (Haleakala Dead Volcano) हा मौवी बेटावर आहे. हालेआकलाच्या शिखरपरिसराला 'हालेआकला' म्हणजे 'सूर्याचे घर' (house of the sun) असे सुरुवातीचे हवाईतील लोक म्हणत असत. बेटाच्या

पश्चिम दिशेला असलेल्या या पर्वताच्या शिखरावरून पूर्वेला उगवणारा सूर्य दिसत असल्याने बहुधा या पर्वतशिखराला 'हालेआकला' म्हणजे 'सूर्याचे घर' असे म्हटले जात असावे.

'हालेआकला'च्या शिखरपरिसरात एक अति प्रचंड घळ आहे. या घळीविषयी हवाईच्या लोकसाहित्यात एक लोककथाही आहे. सूर्याला पकडून दिवस मोठा करणा-या मौवी गंधर्वाच्या आजीचे वसतिस्थान या घळीत होते. 'हालेआकला'च्या शिखरपरिसरातील या घळीला त्यामुळे विशेष महत्त्व आहे.



'अमेरिकन वाङ्मयाचा पितामह' (The Father of American Literature) म्हणून विख्यात विल्यम फॉल्कनरने (William Faulkner) जगप्रसिद्ध अमेरिकन कादंबरीकार व साहित्यिक मार्क ट्वेन (Mark Twain) याला गौरवले होते. असा असामान्य प्रतिभा लाभलेल्या मार्क ट्वेन याने हवाईला भेट दिली होती. या भेटीत सन १८६६ मध्ये मार्क ट्वेन मौई बेटावरील या हालेआकला मृत ज्वालामुखीवरून दिसणारा मनोहर सूर्योदय अनुभवण्यासाठी मुद्दाम आवर्जून गेला होता. त्याने लिहिले आहे, की 'मी ह्या अनुपम, अद्वितीय अशा सूर्योदयाचा साक्षीदार होतो आणि याच्या आठवणी मी कायम जपून ठेवेन.'

अशा या विख्यात असलेल्या हालेआकला मृत ज्वालामुखीच्या शिखरावर पोहचायला दोन तीन तास लागतात. या ज्वालामुखीची समुद्रसपाटीपासूनची उंची १०,०००फूट आहे. हा त्याच्या सौंदर्यपूर्ण, अद्वितीय सूर्योदयासाठी प्रसिद्ध आहे. हवाईला आल्यावर करायलाच पाहिजे अशी ही टूर आहे. या टूरला वयाचे काही बंधन नाही. कंपनीची व्हॅन आपल्याला घेऊन जाते आणि परत आणूनही सोडते. सूर्योदय पाहून झाल्यावर हालेआकलावरून ज्यांना पर्वताचे सौंदर्य पाहत, विविध जातींच्या वृक्षांची माहिती घेत व रानफुले पाहत उतरायचे असेल त्यांच्यासाठी खास बायसिकल टूर आहे. आम्ही ही टूर घेतली होती.

ठरल्याप्रमाणे अपरात्री २-१५ वाजता पिकअप व्हॅन आली. आम्ही त्यात बसलो. अजून दोन तीन ठिकाणी थांबून तिथल्या जवळ जवळ दहा बारा पर्यटकांना घेऊन आम्ही निघालो. व्हॅनमध्ये

बसल्यावर आमच्या गाईडने आम्हाला प्रश्न विचारायला सुरुवात केली. कोण कोण बायसिकल राइड घेणार? किती वर्षांपासून तुम्ही सायकल चालवत आहात? सध्या चालवता का नाही? जर तुम्ही राइड घेणार असाल तर या कागदपत्रांवर सह्या करा; कारण पडला, काही घडले तर त्याचे जबाबदार तुम्हीच असाल. हे ऐकून आम्हाला मात्र इकडे वाटत होते की साध्या सायकल चालवण्याकडे हा केवढ्या गंभीरपणे बघतोय! आपल्याला तर त्याच्यात काहीच वाटत नाही. किती साधी राइड आहे ही! पण आम्ही जस जसे पर्वत चढू लागलो तेव्हा पटले की गाइड म्हणतोय त्यात खूपच तथ्य आहे. तीव्र चढ उतार खूप आहेत. सायकल कंट्रोल झाली नाही तर ती कुठल्या कुठे जाईल.

जवळ जवळ दोन अडीच तासांनी आम्ही नियोजित जागेवर म्हणजे हालेआकला ज्वालामुखीच्या माथ्यावर आलो. आमच्या पिकअप व्हॅनलाच सायकलींनी भरलेली एक पांढ-या रंगाची एक बंद ट्रॉली जोडलेली होती.




व्हॅन पार्क केल्यावर आम्ही सगळे पांगलो. आपल्याला योग्य वाटतील अशा जागा आम्ही सूर्योदय पाहण्यासाठी निवडल्या. या पर्वतमाथ्यावर गर्दी तर प्रचंडच होती. आपल्याकडे थंडीत जसे शाली लपेटून बसतात तसे बरेच जण जोडी जोडीने जाड दुलईसारखे पांघरून घेऊन बसले होते. दहा बारा लोक अजून थोड्या उंचावर गेलेले पाहिले; पण तिथे जाणे खूप अवघड वाटत होते. आम्ही कोट, हातमोजे घालून आलो होतो. थंडी खूप होती. आता आम्ही अत्युच्च अशा मृत हालेआकला ज्वालामुखीच्या अगदी वरच्या टोकावर होतो. आमच्या नजरेला फक्त ढगच ढग दिसत होते. काळे काळे. दाट. वेगवेगळ्या आकारांचे. सागरलाटांसारखे क्षितिजापर्यंत पसरलेले. या सुंदर ढगांच्या खाली अथांग असा प्रशांत महासागर पसरलेला होता. म्हणजे आम्हाला जो सूर्योदय पाहायचा होता तो ढगांवरचा होता!

<u>ढगांवरून झालेला सूर्योदय</u>!

हळू हळू सूर्योदयाची वेळ जवळ येऊ लागली तशी सगळ्यांचीच उत्कंठा क्षणाक्षणाला शिगेला पोहचायला लागली. सुरुवातीला ढगच ढग दिसत होते आणि ढगांच्याही वर पसरलेले काहीसे काळसर पण निळे असलेले आकाश आम्हाला दिसत होते. सगळ्यांच्या नजरा सारख्या घड्याळाकडे जात होत्या पण घड्याळाचा काटा फार हळू हळू पुढे सरकत होता. त्याला घाई नव्हती. आम्हाला होती. ढगांवरून

उगवणारा सूर्य बघायची. त्या दिवशी सूर्योदयाची वेळ होती ५-३८ची. म्हणून सगळ्यांच्या समोर घड्याळातला आकडा होता एकच. ५-३८. हळू हळू त्याच्या स्वतःच्या गतीने काटा एकदाचा पुढे सरकला. ५-३८ झाले ! त्या बरोबर सगळीकडून अहाहाऽ ! अहाहाऽ ! असे शब्द ऐकू येऊ लागले. आता आकाशाचा रंग बदलला. केशरी रंग सगळीकडे पसरू लागला. भरू लागला. हळू हळू तो अधिक अधिक गडद होऊ लागला. आकाशात भरत जाणारा केशरी रंग मनाला मोहिनी घालू लागला. देहभान विसरून सगळे बघू लागले. - आणि - आणि एकदम ढगांची कडा रुपेरी दिसू लागली. माझ्या हातातल्या





कॅमेरॅने मी फोटो काढू लागले तर कॅम कॉर्डरने हे शुटिंग करू लागले. आम्हाला एवढे समाधान होते की आपण हे सगळे क्षण जे अतीव आनंदाचे आहेत ते या पद्धतीने तरी मुलांना दाखवू शकू. पुढच्याच क्षणी रुपेरी कडांवर डायमंड रिंग (Diamond Ring) दिसू लागली. आपल्याकडच्या भाषेत सांगायचे तर उषेने तिचे सौंदर्य अप्रतीमरीत्या दाखवायला सुरुवात केली. अति सुंदर - वाऽहवा असे शब्द आमच्या तोंडून आपोआपच येऊ लागले. कॅमेरॅचे क्लिक् क्लिक् असे कित्येक आवाज ऐकू येऊ लागले. केशरी रंग अजून गडद झाला. त्याच्या बरोबर आता कोवळे ऊनही पडले होते. त्यामुळे सगळीकडचे वातावरण केशरी केशरी झाले. आम्हीही त्या केशरी रंगात रंगलो. खरोखर आम्ही केशरीच झालो.



आम्ही आमचे फोटो आणि शुटिंग वेड्यासारखे घेत राहिलो. काल याच मौई बेटावर आम्ही स्नॉर्कलिंग केले होते; तेव्हा समुद्रखजिना पाहिला होता आणि आज आता सृष्टिदेवता तिच्या जवळ जो केशरी रंग होता त्यात आम्हाला अक्षरश: रंगवत होती. डुंबवत होती. आम्ही ते सौंदर्य पिऊन घेऊ लागलो. आकंठ पिऊ लागलो. असा जवळ जवळ अर्धा तास गेला. मग मात्र प्रत्येक जण शुद्धीत आल्या सारखा दिसू लागला. आता गर्दी पांगू लागली. या नंतरच्या पंधरा वीस मिनिटांत सगळ्या मोटारी दिसेनाशा झाल्या; कारण हे कारवाले लोक फक्त सूर्योदय पाहण्यासाठीच आले होते. ज्या लोकांनी बायसिकल राइड घ्यायची ठरवली होती तेवढेच लोक त्यांच्या त्यांच्या गाइडजवळ जाऊ लागले. आम्हीही आमच्या गाइडजवळ गेलो.

<u>बायसिकल राइडला निघण्यापूर्वी</u> ... :

पिकअप व्हॅनलाच सायकलींनी भरलेली पांढ-या रंगाची जी बंद ट्रॉली जोडून आणलेली होती तिच्यातून सायकली बाहेर काढल्या गेल्या. आमच्या गाइडने आता प्रत्येकाला एकेक सायकल दिली. आम्ही दहा बारा जण होतो. चार पाच जोड्या होत्या आणि एखादा एकटा आलेला होता. या सर्वांत आम्ही दोघेच काय ते भारतीय होतो. बाकी वेगवेगळ्या देशांतून आलेले होते.

आम्ही आमच्या सायकली हातात धरल्या. बायसिकल राइड होती २८ मैल म्हणजे साधारण ६० कि.मि.ची. तीव्र उताराची. त्यामुळे साहसी खेळात मोडणारी. सगळे रायडर्स २५ ते ३५ वयोगटातले त्यामुळेच होते. या कारणाने ते नुसते 'सायकलस्वार' नव्हते तर 'बायसिकल रायडर्स' होते. तो गाइडही ३५चा असेल.

या 'यंग बायसिकल रायडर्स'मध्ये आम्ही दोघेच काय ते 'ओल्ड बायसिकल रायडर्स' होतो. पन्नाशीचे होतो. मी ५० वर्षांचे तर हे ५१ वर्षांचे. त्यामुळे गाइडने आम्हाला 'सायकल इथेच चालवून बघा' म्हणून सांगितले. 'जर जमले नाही तर तुम्ही आमच्या बरोबर व्हॅनमधून येऊ शकता' असेही गाइड म्हणाला. त्याने आम्हाला प्रत्येकाला हेल्मेट दिले. डोक्यावर हेल्मेट, अंगात थंडीचे कपडे, हातात थंडीचे मोजे असा आमचा जड जड पेहराव झाला. या वेळपर्यंत सगळे ठाकठीक होते.





त्यांनी सायकल घेतली आणि पटकन चालवायला सुरुवात केली. मग मीही सायकलसीटवर बसले. आणि ... ? ... आणि पडायलाच लागले ! मला हा माझा फार मोठा अपमान वाटायला

लागला. तीन चार वेळा प्रयत्न करूनही सायकल पुढे जाइचना ! सगळेजण माझ्याकडे दयेने पाहू लागले. काही जणांना हसूही येऊ लागले. हे म्हणाले, "अगं, नेहमीच तर चालवायचीस ना तू सायकल. तू का नवखी आहेस ? भांबावू नको. आता शांतपणे सायकलवर बैस आणि चालवायचा प्रयत्न कर. घाबरू नको. येईल तुला. बघ." मग मात्र मला रडायलाच येऊ लागले. रडत रडत चिडून मी म्हणाले, "हो. हो. चालवायची मी सायकल. पण केव्हा ? पंचवीस वर्षांपूर्वी ! अशात नाही. आता केव्हाच माझी सवय मोडली. तरी मला वाटलं होतं. जमेल मला. पण नाही जमत. काय करू ? या गरम कपड्यांनी नुसतं पिडलंय. शी: कित्ती घाण उकडतंय." मी बडबडले. स्वत:वरची चीड अशी बाहेर पडली. मग थोडे बरे वाटले. किंचित शांतही वाटले. आयुष्यात कधी असे घडले नव्हते. शेवटी मी एवढ्या थंडीतही घामघूम झाले आहे, त्यामुळे आपल्याला काही सुचत नाही हे माझ्या लक्षात आले. मी सगळ्यांना तिथून थोडे पुढे जायला सांगितले. मग मी सगळ्यात आधी कोट काढला. त्याच्या आत पंजाबी ड्रेस होता. तोही काढून टाकला. आता मी मूळ जो टी शर्ट घातला होता आणि जी स्लॅक्स घातली होती त्यावर उभी होते. त्या बरोबर उकडणे बंद झाले. डोके चालणे सुरू झाले. मग माझ्या लक्षात आले की आपण पूर्वी सायकल सरळ सीटवर बसून कधी चालवत नव्हतो. एका पायाने पॅडल मारून सायकल पुढे पुढे नेऊन मग पुढच्या बाजूने सीटवर बसत होतो. मग काय म्हणता महाराजा ! आम्ही सायकलवर वीरासारखे स्वार झालो आणि एकदम गोल गोल चकरा मारू लागलो ! तो गाइड आश्चर्यानेच माझे सायकलवर सहज बसणे व सहज चालवणे पाहत होता. मग तो गाइडही माझ्याशी कौतुकाने बोलू लागला. 'लोक पुढे गेले आहेत आता तुम्ही दोघे माझ्या मागून या' असे म्हणाला.

<u>बायसिकल राइड सुरू</u> ! :

आता आमची बायसिकल राइड ख-या अर्थाने सुरू झाली. पाच दहा मिनिटातच आम्ही सगळ्यांच्या जवळ जाऊन पोहोचलो. पुढे गेलेल्या सगळ्यांना वाटत होते मी बहुतेक व्हॅनमध्ये असणार; पण गाइड व हे या दोघांबरोबर मला पाहून ते चकरावलेच. ते सगळेच तरुण लोक थंडीच्या गरम कपड्यांमध्ये होते. फक्त मी आणि हेच साध्या ड्रेसमध्ये होतो. माझे पाहून यांनीही कोट काढून टाकला होता. आता फक्त डोक्यावर हेल्मेट, पायात स्पोर्टस् शूज आणि हातात थंडीचे मोजे. ते मात्र शेवटपर्यंत काढता आले नाहीत कारण हात काकडून बोटांना वात यायचा. आता माझ्या अंगात जणू भूत संचारले. मी त्या दहा बारा लोकांना मागे टाकून पुढे पळू लागले. त्या गाइडलाही मागे टाकले ! तेव्हा मात्र तो ओरडू लागला. "ऊ ऽ षा हळू चालव. ऊ ऽ षा हळू चालव." मग मी आणि तो गप्पा मारत मारत पर्वत उतरू लागलो. हे मात्र मागे अकराव्या नंबरवर होते ! आम्हाला एकूण साठ कि.मि.पर्वत उतरायचा होता. वळणा वळणांवर अति सांभाळून सायकल चालवायची होती. माझे मजेत गप्पा मारून सायकल चालवणे आमच्या सर्व तरुण बायसिकल रायडर्सना आवडत नव्हते. त्यांच्या तरुण बायका आधी माझ्याकडे दयेने पाहत होत्या. आता बायकांबरोबर पुरुषही माझ्याकडे दयेच्या ऐवजी रागारागाने पाहू लागले. "ही कोण कुठली पन्नास वर्षांची बाई आणि आपल्या पुढे पुढे पळतेय आणि गाइडही तिचेच कौतुक करतोय !"

बघता बघता आम्ही अर्धा पर्वत उतरलो. या ठिकाणी सपाट जागा होती. “ज्यांना फोटो काढायचे आहेत त्यांनी काढून घ्या. दहा पंधरा मिनिटे आपण येथे थांबणार आहोत.” असे गाइडने आम्हाला सांगितले. सुरुवातीला माझ्या गोंधळामुळे आम्ही फोटो काढू शकलो नव्हतो. मग आता इथे फोटो काढणे सुरू केले. ह्यांनी शुटिंग केले.

गाइडने ह्यांच्या सायकलच्या मागच्या चाकावर मला उभे राहायला लावले. हे सीटवर बसलेले होते. ह्यांच्या खांद्याला धरून मी उभे राहिले तर तो काय म्हणतो ? - आता तू एक पाय मागे उचलून उभी रहा ! मी कशी बशी तोल सावरत उभी राहिले. तो म्हणाला, “आमच्या बाइक टूर (bike tour) साठी मी



तुमचा फोटो वापरीन. आमच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर तो छापेन.” सगळ्यांना तो कौतुकाने सांगू लागला. दाखवू लागला. “ बघा, बघा सगळ्यांत वयाने जास्त असलेले हे दोघे. नुसत्या पॅन्ट शर्टवर आहेत. आपण वयाने लहान असूनही कोटात आहोत. एवढेच नाही तर ही ऊ ऽ षा सगळ्यांच्या पुढे आहे.”

आता मात्र माझ्याशी खरंच कुणी बोलेना. त्या विविध देशातील तरुणी माझ्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करू लागल्या. मला टाळू लागल्या. आपापसात त्यांच्या भाषेत काही तरी बोलू लागल्या. गाइडचे बोलणे त्यांना मुळीच रुचले नव्हते. आम्हा दोघांनाही हे अनपेक्षित होते. त्यामुळे हे सगळे चमत्कारिक वाटू लागले. म्हणून आम्हीच त्यांच्याशी बोलू लागलो.

परत आमचा उरलेला प्रवास सुरू झाला. परत आम्ही वेगाने उरलेला पर्वत उतरू लागलो. हा प्रवासही अतिशय मजेत पार पडला. खाली उतरल्यावर त्याने आम्हा सगळ्यांना एका छानशा हॉटेलमध्ये नेले. तेथे आम्ही उत्तम पेस्ट्री खाल्ली. मस्त चवदार गरम गरम कॉफी प्यालो. पोटात गरम कॉफी गेल्याने आणि थोडा फार नाष्टा झाल्याने आमचा थकवा पळाला. दोघांची तब्येत खुश झाली. आम्ही तरतरित झालो.

नाष्ट्यानंतर आम्ही अगदी समुद्रकिना-यापर्यंत सायकल चालवत आलो. येथे गाइडने त्यांच्या सायकली ताब्यात घेतल्या. आम्हाला समुद्रावर चक्कर मारून येण्यास सांगितले. याच प्रशांत महासागरात मी काल स्नॉर्कलिंग केले होते. एका सुबक फळीला धरून हे आणि मी पाण्यात तरंगत

होतो. आता याच महासागराच्या लाटा पायांवर घेत मी उभी राहिले. समाधानाने शांतपणे महासागर न्याहाळू लागले. न्याहाळू लागलो.

सौ. उषा प्रभुणे

- **या लेखात वापरलेले ९ फोटो पुढील पानांवर स्वतंत्रपणे JPG फॉरमॅटमध्ये दिले आहेत. कृपया पाहावेत.**

सौ. उषा प्रभुणे
३९८७ ॲव्हिग ॅान लेन,
सॅन होजे, कॅलिफोर्निया ३५३४५
अमेरिका
usha_prabhune@yahoo.com